**प्रकल्प प्रवर्तक खनीकर्म कार्यालय- नाशिक यांनी तहसील कळवण, जिल्हा - नाशिक, महाराष्ट्र येथील गिरणा व पुनद नदी पात्रातील प्रस्तावित दोन वाळू घाटाचे वाळू / रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणीचे इतिवृत्त**

---

प्रकल्प प्रवर्तक खनीकर्म अधिकारी- नाशिक यांनी तहसील कळवण, जिल्हा नाशिक, महाराष्ट्र येथील गिरणा व पुनद नदी पात्रातील प्रस्तावित ०२ (दोन) वाळू घाटाचे वाळू / रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी सोमवार दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता, पंचायती समिती सभागृह, मानूर, तहसील कळवण, जिल्हा नाशिक येथे आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४.०९.२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१.१२.२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ८३/२०२१, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/(डब्लुपीसी) /पीएच/बी-- २१०९१६ -एफटीएस-९३ दिनांक १६.०९.२०२१ अन्वये खालील प्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हा दंडाधिकारी, नाशिक,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांच्या पेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>नाशिक | - संयोजक |

श्री, अमर दुर्गुळे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नाशिक तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

संयोजक,पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री.अमर दुर्गुळे, संयोजक यांनी असे सांगितले की म.प्र.नि. मंडळास प्रकल्प प्रवर्तक खनीकर्म अधिकारी कार्यालय - नाशिक यांनी तहसील कळवण जिल्हा नाशिक येथील गिरना नदी पात्रातील प्रस्तावित ०१ व पुनद नदीपात्रातील १ वाळुघाटांचे वाळु उत्खनां संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

संयोजक यांनी सांगीतले की  पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ०३.१२.२०१९ च्या पत्रान्वये वाळू घाट प्रकल्पास पूर्व पर्यावरण अनुमतीकरीता, पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग २ (ब) नुसार पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

संयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पा विषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत/ सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. अनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ नाशिक यांनी स्थानिक वृतपत्र मराठी दैनिक सकाळ व दैनिक देशदूत टाइम्स इंग्रजी यात दिनांक २१.०१.२०२३ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती .त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पा विषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते .

त्याप्रमाणे भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेप्रमाणे वाळूघाटा संबंधिची ठळक वैशिष्ट्ये असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती व मराठी व इंग्रजीत कार्यकारी सारांश माहिती असलेले कागदपत्रे शासनाच्या सूचित कार्यालयात म्हणजे मा.संचालक ,पर्यावरण विभाग, मंत्रालय , मुंबई , मा.जिल्हादंडाधिकारी कार्यालय नाशिक ,सह संचालक (ज.प्र.नि.) मप्रनि मंडळ, सायन पू ,मुख्य कार्यकारी अधिकारी- जिल्हा परिषद, नाशिक, प्रादेशिक अधिकारी ,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ ,नाशिक , उपविभागीय अधिकारी कार्यालय ,कळवण जिल्हा-नाशिक ,तहसीलदार -तालुका कार्यालय कळवण ,

जिल्हा - नाशिक, ग्रामपंचायत कार्यालये- नाकोडे व ककाणे ता. कळवण ,जिल्हा - नाशिक, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्य संकेत स्थळावर कार्यकारी सारांश सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते .

संयोजक यांनी सांगितले उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले .

श्री. विशाल नरवाडे, उप-विभागिय दंडाधिकारी, कळवण तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागारांना प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सादरहीकरणानंतर सर्व जनसमूहाला त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले .

श्रीमती रोहीणी चव्हाण , प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांसह पर्यावरण विषयक विकासासाठी राखीव ठेवलेला निधी व प्रस्तावित सामाजिक उपक्रम याविषयी माहिती सादरी करणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. सदरील २ वाळु घाटांचे एकुण क्षेत्र २.१ हेक्टर, वाळु साठा २२३१ ब्रास एकुण रु. १३,३८,६००/- त्यांनी सांगितले ओपन कास्ट विना ड्रिलींग व स्फोट न करता उत्खनन मनुष्यबळ वापरून हाताने केले जाईल, मनुष्य बळाचा,घमेली,कुदळ फावड्या सारख्या उपकरणांचा वापर केला जाईल. वाळूचे उत्खनन हे केवळ कोरड्या नदीपात्रातून केले जाईल. हवा प्रदुषण व्यवस्थापनासाठी वाळू वाहतूकिच्या कच्चा रस्त्यावर पाण्याची फवारणी केली जाईल. वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर व ट्रक ताडपत्रीने झाकले जातील. नदी काठावर आणि वाळूघाटा नजिकच्या मोकळ्या जागेवर वृक्षलागवड केली जाईल. ध्वनी प्रदुषण व्यवस्थापनासाठी उत्खनन आणि वाळू वाहतूक हि केवळ दिवसा केली जाईल. जलप्रदुषण व्यवस्थापनासाठी उत्खनन केवळ भुजल पातळीच्यावर केले जाईल. नदी प्रवाह निष्क्रिय पात्राकडे वळवला जाणार नाही. नदी काठावर आणि नदी पात्रा बाहेरील रस्ता रिक्त स्थानी वृक्षांची लागवड केली जाईल. आरोग्य सुरक्षा व्यवस्थापन संरक्षक शिरस्त्राण व पादत्राणे, तसेच कान, डोळे व हातासाठी प्रतिबंधात्मक उपकरणे पुरवली जाईल.

सादरीकरण पूर्ण झाल्यावर अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जिल्ह्यात २ वाळूघाटां विषयी जनसुनावणी असून महाराष्ट्र शासनाने दिनांक ०३.१२.२०१९ च्या सूचनेनुसार

वाळूघाट उत्खननास पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी आगाऊ जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्याचे सूचित केले आहे. त्यानुसार ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनाबाबत सादरीकरण केलेले आहे. तरी उपस्थितांनी त्यांचे काही पर्यावरण विषयक सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक /प्रकल्प सल्लागार/ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणेआहे –

१. श्री. राकेश आप्पा गुंजाळ, नाकोडे, ता. कळवण, जि.नाशिक:- यांनी सदर वाळु घाटमधुन वाळु उत्तखनन करण्याचा कालावधी कमी आहे. तसेच पाणी असल्याने कामगारामार्फत वाळु उत्तखनन करणे शक्य होत नाही. असे नमुद केले.
२. श्री. विशाल वसंत आहेर, ककाणे, ता. कळवण, जि.नाशिक:- यांनी सदर वाळु उत्तखनन लिलाव बंद करणे, कारण वाळु उत्तखननामुळे विहीरीच्या पाण्याची पातळी कमी झाली आहे.
अध्यक्ष यांनी असे सांगितले की, तहसिलदार व इतर शासकीय अधिकाऱ्यांनी पाहणी केल्यानंतरच सदर वाळु घाटांचा लिलावा करीता समावेश केलेला आहे.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना, टिका टिपण्णी असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांना विचारलेल्या आक्षेपकांना पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करुन महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास सादर करण्यात येईल. त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे, शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक, स्थानिकांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले. माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक पार पडली.

**(अमर दुर्गुळे)**
**संयोजक,**
**पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती**
**तथा**
**उप प्रादेशिक अधिकारी,**
**मप्रनि मंडळ,**
**नाशिक**

**(श्री. विशाल नरवाडे)**
**अध्यक्ष,**
**पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती**
**तथा**
**उप-विभागिय दंडाधिकारी, कळवण,**
**जिल्हा- नाशिक**